# विशेष अधिवेशन कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष :** महाराष्ट्र विधान सभेचे विशेष अधिवेशन दिनांक ३ व ४ जुलै, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आले. या दोन दिवसांच्या कालावधीत प्रत्यक्षात ०९ तास ३५ मिनिटे कामकाज झाले.

या विशेष अधिवेशनामध्ये मंत्र्यांचा परिचय, नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय, विधानसभा अध्यक्षांची निवड, शोक प्रस्ताव, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशन व मंत्रिमंडळावरील विश्वासदर्शक प्रस्ताव पारित करणे हे कामकाज घेण्यात आले. या बरोबरच माननीय अध्यक्षांवर विश्वास व्यक्त करणारा विश्वासदर्शक प्रस्ताव देखील संमत करण्यात आला. तसेच श्री.अजित पवार यांची माननीय विरोधी पक्ष नेते म्हणून निवड करण्यात आली.

भारतीय संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेल्या महाराष्ट्र विधानसभेत आपण सर्व सन्माननीय सदस्य उत्तम आणि परिणामकारक वैधानिक कार्य पार पाडण्यासाठी तत्पर राहूया अशी सदिच्छा मी व्यक्त करतो. पुन्हा एकदा माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय उपाध्यक्ष, माननीय तालिका सभाध्यक्ष, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व सन्माननीय सदस्य, तसेच, विधानमंडळाचे, सुरक्षा विभागाचे, मंत्रालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी आभार मानतो.

........